मिरा भाईंदर महानगरपालिका

वाहन व यांत्रिकी विभाग

प्रेस नोट

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील दि.30/10/2025 रोजीचा दै.न्युभारत व दि.31/10/2025 रोजीचा दै.दोपहर का सामना या वृत्तपत्रात महानगरपालिकेने जाणुनबुजून रुग्णवाहिका बंद ठेवण्याबाबत दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणेबाबत वृत्तपत्रात प्रसिद्धी दिलेली आहे. सदरकामी मा.आयुक्त महोद्य यांनी वैद्यकीय आरोग्य विभाग तसेच वाहन व यांत्रिकी विभाग यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. महानगरपालिकेमध्ये एकूण 07 रुग्णवाहिका, 04 शववाहिनी व इतर 07 वाहने वैद्यकीय आरोग्य विभागाकडील आरोग्यविषयक सेवा देणेकरीता उपलब्ध आहेत. रुग्णवाहिकांपैकी 02 रुग्णवाहिका बंद होत्या व इतर सर्व वाहने चालू स्थितीमध्ये आहेत. बैठकीमध्ये मा.आयुक्त सो. यांनी बंद रुग्णवाहिका त्वरित चालू करणेबाबत निर्देश दिलेले आहेत व त्यांचे काम सुरु करण्यात आलेले आहे. वृत्तपत्रामध्ये नमुद 02 रुग्णवाहिका क्र. १) MH 04 EP 0710 २) MH 04 EP 0159 निर्लिखित करण्यात आलेल्या आहेत. सदरकामी ठेकेदार मे.जे.के.मेटल यांस दि.30/10/2025 रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे तसेच सदरील 02 निर्लिखित रुग्णवाहिका दि.31/10/2025 रोजी ठेकेदारामार्फत उचलण्यात आलेल्या आहेत.

तरी रुग्णवाहिका या जाणीवपूर्वक बंद ठेवण्यात आलेल्या नाहीत. त्यांची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते. वरीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

डॉ.सचिन बांगर
उपायुक्त (वाहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Receipt No. 7369601U/2025/MBMC-Vahan (Computer No. 7369603)
Generated from eOffice by JAYWANT VARAN BHAVAR, CLRK(JB/PR), CLERK, MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION on 31/10/2025 05:57 PM